Maharashtra State Board Of
Secondary & Higher
Secondary Education
Latur Divisional Board
Latur-413531

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ, लातूर
विभागीय मंडळ, लातूर-
४१३५३१

सुतमिल एरिया,कन्हेरी रोड, राजस्थान शाळेच्या पाठीमागे, गजानन नगर, लातूर

Divisional Chairman Ph :( O) 229258 Divisional Secretary Ph :( O) 258570 Email: - divsecretarylatur@gmail.com

महत्वाचे / तातडीचे / परीक्षा प्राधान्य

जा.क.लाविम / माध्य.अ / 2807
दिनांक :- 04/03/2026

प्रति,

मुख्याध्यापक / प्राचार्य
सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालये.
**लातूर / नांदेड / धाराशिव.**

**विषयः–** .फेब्रुवारी–मार्च 2026 च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10 वी) परीक्षा व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. 12 वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांचे कीडा सवलतीचे प्रस्ताव ऑनलाईन सादर करणेबाबत.

**संदर्भः–** क.रा.मं. / परीक्षा–7 / 908 दि. 26 / 02 / 2026 चे पत्र.

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरून कळविण्यात येते की, फेब्रुवारी–मार्च 2026 उच्च माध्यमिक प्रमाणपत्र **(इ.12वी)** व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र **(इ.10वी)** परीक्षांचे निकाल मागील वर्षीप्रमाणे लवकर जाहीर करण्याच्या दृष्टीने कीडा सवलतीचे प्रस्ताव जिल्हा कीडा अधिकारी यांचेकडून विभागीय मंडहळाकडे आपले सरकार या पोर्टलव्दारे ऑनलाईन पध्दतीने **दिनांक 15 एप्रिल, 2026** पर्यंत स्विकारण्यात येत आहेत.

तसेच एन.सी.सी., स्काउट गाईड इत्यादी प्रस्ताव शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी **प्रचलित पध्दतीने** विभागीय मंडळाकडे **दिनांक 15 एप्रिल 2026** पर्यंत जमा करावेत.

त्याअनुषंगाने शाळा / कनिष्ठ महाविद्यालय यांनी जिल्हा कीडा अधिकारी यांचेकडे ऑनलाईन पध्दतीने अर्ज / प्रस्ताव सादर करण्यासाठी ऑनलाईन प्रणाली उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्यानुसार आपले सरकार या पोर्टलवर **URL: https://applesarkar.mahaonline.gov.in**या लिंकव्दारे शाळा / कनिष्ठ महाविद्यालय यांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज संबंधित जिल्हा कीडा अधिकारी यांचेकडे पाठवावयाचे आहेत.

शाळा / कनिष्ठ महाविद्यालय यांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्यासाठी मागील वर्षीचे ऑनलाईन प्रणालीचे **User Manual** सोबत जोडले आहे त्याप्रमाणे कार्यवाही करावी. तसेच पोर्टलवर अर्ज भरताना अडचण आल्यास विद्यार्थ्यांनी पोर्टलवरील **Toll Free** कमांकावर संपर्क साधावा व कीडा गुण प्रस्ताव सादर करणेसंदर्भात काही अडचण आल्यास संबंधित जिल्हा कीडा अधिकारी यांचेशी संपर्क साधावा.

शाळा / कनिष्ट महाविद्यालयांनी खेळाडू विद्यार्थ्यांचे कीडा प्रस्ताव विहित कागदपत्रे सादर न केल्यामुळे जिल्हा कीडा अधिकारी कार्यालयाकडून अपात्र केल्यास, अशा प्रस्तावातील कागदपत्रांची त्रुटीची पुर्तता करून सांबंधित जिल्हा कीडा अधिकारी यांचेकडे सादर करण्याची जबाबदारी संबंधित शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांची राहील, याची नोंद घ्यावी.

(अनुपमा भंडारी)
**विभागीय सचिव,**
**लातूर विभागीय मंडळ, लातूर**

**प्रत माहितीस्तव :–**
1. मा. सचिव महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
2. विभागीय शिक्षण उपसंचालक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, लातूर.

**प्रत माहितीस्तव कार्यवाहीसाठी :–.**
1. शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परीषद, कार्यालय लातूर / नांदेड / धाराशिव